# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पालघर जवळील जेनसिस इंडस्ट्रियल इस्टेट औद्योगिक वसाहतीमधील आनंद इंजिनिअरिंग या कंपनीला आग लागल्याबाबत

**(१) २०३२ (२२-१२-२०१४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जवळील जेनसिस इंडस्ट्रियल इस्टेट औद्योगिक वसाहतीमधील आनंद इंजिनिअरिंग या कंपनीला दिनांक २ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आग लागली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत किती जीवित व वित्त हानी झाली आहे,

(३) असल्यास, ही आग लागण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच या नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर आगीमध्ये कारखान्याचे अंदाजे रुपये पाच कोटीचे नुकसान झाले असून एक कामगार किरकोळ जखमी झाला आहे.

(३) सदर आग विद्युत शॉर्ट सर्कीटमुळे लागली असल्याचे, विद्युत निरीक्षकाच्या अहवालावरुन दिसून येते.

(४) व (५) अपघातामुळे एखाद्या कारखान्याची वित्तीय हानी झाली असल्यास त्याबाबत मदत देण्याबाबत कारखाने अधिनियमांतर्गत शासनाचे धोरण नाही. तथापि, सदर आगीत झालेल्या नुकसानाबाबत कारखानदाराने विमा संरक्षणासंदर्भात दावा केला असल्यास अनुज्ञेय रक्कम त्यांना मिळू शकेल.

---

**रायगड जिल्ह्यातील पर्यावरणदृष्टया संवेदनशील असलेल्या**
**गिरिस्थान माथेरानचा विकास करण्याबाबत**

**(२) ४७५१४ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पर्यावरणदृष्टया संवेदनशील असलेल्या गिरीस्थान माथेरानच्या विकासासाठी सुमारे १२५ कोटी रुपयावरुन अधिक निधीचा वापर करण्यासाठी शासनाच्या एमएमआरडीएने आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे, केव्हा सुरुवात करण्यात येईल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

सदर योजनेमध्ये खालील कामांचा समावेश आहे:-

(१) नेरळ-दस्तुरी रस्त्याचे (वाहतूक सुरक्षा उपाययोजनेसह रुंदीकरण व सुधारीकरण) जमीन वनविभाग व इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये मोडत असून वन विभागाच्या अभिलेखा प्रमाणे या रस्त्याच्या ६.७० कि.मी. लांबीमध्ये ७ मी रुंदीमध्ये रस्त्याचे काम करण्यास परवानगी आहे. १+१ मार्गिका रस्ता पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणा-या वन जमिनीचा रस्त्याच्या वापर करण्याच्या दृष्टीने मंजूरी मिळविण्यासाठी प्रस्ताव वनखात्याकडे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१६ रोजी सादर करण्यात आला असून हे काम तातडीने १५ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

(२) दस्तुरी माथेरान कच्या पदपथाचे सुधारिकरण व

(३) पॅनोरमा पॉईट, हार्ट पॉईट, मायदा पॉईट, इको पॉईट या ४ दर्शनीय स्थळांच्या पोहोच मार्गाचे सुधारीकरण

सदर प्रस्तावित कामाच्या अंमलबजावणीबाबत दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वनखात्याच्या अधिका-यांनी प्रस्तावित कामाच्या स्थळांची पाहणी केली असून वनखात्याचा अभिप्राय प्राप्त होताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**मुंबई महापालिका परिसरात दहा वर्षात ७ हजार १५३ विहिरी गायब झाल्याबाबत**

**(३) ५३६७६ (२६-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका परिसरात दहा वर्षात ७ हजार १५३ विहिरी गायब झाल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ मध्ये महापालिकेने १ हजार २३५ विहिरींची दुरुस्ती आणि स्वच्छता करण्यासाठी २९ कोटी रुपये खर्च केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या संख्येत विहिरी गायब होणेबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २००९-२०१० या वर्षात एकूण ९०७ विहिरींचा गाळ काढून स्वच्छता आणि दुरुस्तीची कामे करण्यात आली.

सदर कामासाठी रु. २६.३४ कोटी खर्च झाले आहेत.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आक्सा बीचवरील कंत्राटी जीव रक्षकांच्या वेतनवाढीबाबत**

**(४) ५३९८९ (२९-०८-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिम येथील सर्वात धोकादायक असणा-या आक्सा बीचवरील कंत्राटी जीव रक्षक गत ६ वर्षापासून तुटपुंजी वेतनावर उदरनिर्वाह करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या कायमस्वरूपी जीव रक्षकाला ८ तास काम करण्याचे २२ ते २५ हजार मिळत असून सदर कंत्राटी जीव रक्षकला १० तास काम करण्याकरिता केवळ १० हजार मिळत असल्याचे समोर आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी जीव रक्षकाला महापालिका वयाच्या ३० व्या वर्षी निवृत्त करीत असून महापालिकेच्या जीव रक्षकाला वयाची अट ही ५८ असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी जीव रक्षकांची वेतनवाढ व निवृत्ती वय वाढविण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) महानगरपालिकेच्या कायमस्वरुपी जीवरक्षकाला महापालिका नियमानुसार रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९५० या वेतनश्रेणीत वेतन व भत्ते दिले जातात.

कंत्राटी पध्दतीवरील जीवरक्षकाची नियुक्ती ही सहा महिन्यांच्या कालावधीसाठी केली जात असून त्यांना १० तासाच्या कामाकरिता रु. १२,०००/- प्रतिमाह इतके वेतन देण्यात येते.

(३) कंत्राटी पध्दतीवरील जीवरक्षकाची नियुक्ती ही सहा महिन्यांच्या कालावधीसाठी केली जात असल्याने त्यांच्या निवृत्तीच्या वयाचा प्रश्न उद्भवत नाही.

महापालिका जीवरक्षक हे महानगरपालिका नियमानुसार वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त होतात.

(४) व (५) कंत्राटी पध्दतीवरील जीवरक्षक व पावसाळी मोसमादरम्यानचे कंत्राटी जीवरक्षक यांच्या वेतनामध्ये जानेवारी, २०१६ पासून वाढ करण्यात आली असून, त्यांना दरमहा अनुक्रमे रु. १२,०००/- व रु. ९,६००/- इतके वेतन देण्यात येते.

कंत्राटी पध्दतीवरील जीवरक्षकाची नियुक्ती ही सहा महिन्यांच्या कालावधीसाठी केली जात असल्याने त्यांच्या निवृत्तीच्या वयाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील दापोडीतील हॅरीस ब्रिजचा कठडा तुटला असल्याबाबत

**(५) ५५८४० (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दापोडीतील हॅरीस ब्रिजचा कठडा तुटला असल्यामुळे टेम्पो नदीत कोसळल्याची घटना दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अपघातात ८ जण जखमी झाले असून सदरील कठडा तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच नुकसान झालेल्या टेम्पोचालकांना व जखमींना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०१६) :**(१) नाही.

पुणे जिल्ह्यातील दापोडीतील हॅरीस ब्रिजचा कठडा सुस्थितीत होता. दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी टाटा टेम्पो क्रमांक एमएच-०४-डीडी-६८३४ च्या धडकेने कठडा नादुरुस्त होवून सदर टेम्पो नदीत पडला.

(२) दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या अपघातामध्ये सदर टेम्पोचा चालक श्री.शब्बीर उमरउल्ला खान, वय २४ वर्ष जखमी झाला असल्याची नोंद खडकी पोलिस स्टेशनमध्ये झालेली आहे. सदर अपघाताची माहिती मिळताच पुणे महानगरपालिकेकडून कठडा त्वरीत दुरुस्त करणेत आलेला असून, कठड्याच्या उर्वरित भागाला मजबुतीकरण करणेत आलेले आहे.

(३) अपघातग्रस्त टेम्पो पुणे महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाने बाहेर काढला असून जखमी टेम्पो चालकास सह्याद्री रुग्णालयात दाखल केले असल्याबाबत खडकी पोलिस स्टेशन पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे शहरातुन होणाऱ्या अवजड वाहतुकीबाबत

**(६) ५६१०० (२६-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातुन होणाऱ्या अवजड वाहतुकीची समस्या गंभीर बनलेली असल्याने गायमुख ते बाळकूमपर्यंत बायपास रस्त्याचे काम करण्यासाठी एमएमआरडीए व केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत नवी दिल्ली येथे दिनांक १० मे, २०१६ रोजी बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१७) :**(१) नाही. तथापि, वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीकोनातून ठाणे घोडबंदर रस्त्यावरील अवजड वाहतूकीस पर्यायी मार्ग उपलब्ध करण्यासाठी पूर्व द्रुतगती महामार्ग ते घोडबंदर वळणरस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामाची अंदाजित मंजूर रक्कम रु.१२० कोटी इतकी आहे. या कामाकरीता आवश्यक असलेली पर्यावरण विभागाची व वन विभागाची मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुरु आहे. रस्त्याचे कामाकरीता आवश्यक भूसंपादन ठाणे महानगरपालिकेमार्फत झाल्यानंतर कामास सुरुवात करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा प्रभाग समिती अंतर्गत पारसिकनगर येथे उभारण्यात येणाऱ्या मल:निस्सारण प्रकल्पाबाबत

**(७) ५६१११ (२६-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा प्रभाग समिती अंतर्गत पारसिक नगर येथे उभारण्यात येणाऱ्या मल:निस्सारण प्रकल्पाला स्थानिक रहिवाशांचा विरोध असून यासंदर्भात मा. नगरविकास राज्यमंत्री यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये माहे जून, २०१६ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्वसंबंधितांसमवेत बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांवर बैठकीमध्ये कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१७) :**(१) होय.
(२) सद्यस्थितीत उक्त प्रकल्पास दिनांक १९.८.२०१६ रोजी स्थगिती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे शहरातील धोकादायक इमारतींबाबत**

**(८) ५६३२२ (२९-०८-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने पावसाळयापूर्वी शहरातील धोकादायक इमारतींची यादी माहे मे, २०१६ मध्ये जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यातील धोका आणि जिवित हानी टाळण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या नव्या धोरणानुसार महापालिकेने धोकादायक इमारतीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शहरात अत्यंत धोकादायक इमारती किती आहेत, व त्यांच्या पुनर्वसनाकरीता महापालिकेने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) नगर विकास विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ नुसार ठाणे महानगरपालिका हद्दीतील जुन्या व मोडळकीस आलेल्या इमारतींचे वर्गीकरण केले आहे.

अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे या प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ९० इमारतींपैकी ७१ इमारतींवर कारवाई करण्यात आलेली आहे.

अशा धोकादायक इमारतींवर कारवाई केल्यानंतर आजतागायत १९०८ बाधितांना रेंटल हौंसिग स्कीममध्ये सदनिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दादर (मुंबई) मधील छाप्रा आणि मोहसीन या दोन चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(९) ५६४८७ (२९-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर पश्चिमेकडील प्लाझा सिनेमाजवळील छाप्रा इमारत तसेच सेना भवन जवळील जुन्या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प हाती घेणाऱ्या विकासकांनी तेथील कुटुंबांना पर्यायी वास्तव्यासाठी मार्च, २०१५ पासून भाडे देणे थांबविल्यामुळे शेकडो कुटुंबे रस्त्यावर आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील रहिवाश्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी एक वर्षापूर्वी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीच्या पुनर्विकासाचे काम न होण्याची कारणे काय आहेत तसेच रहिवाश्यांना फसविण्याऱ्या विकासकाच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१२-०१-२०१७) :**(१) दादर पश्चिमेकडील प्लाझा सिनेमाजवळ छाप्रा इमारत तसेच सेना भवन जवळील जुन्या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्या-या विकासकांनी मागील काही कालावधी पासून तेथील कुटुंबांना पर्यायी वास्तव्यासाठी देय भाडे अदा केले नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) स्थानिक आमदार श्री.सदा सरवणकर यांनी दि.१५.७.२०१५ च्या पत्राव्दारे मा.मुख्यमंत्री, महोदयांकडे तक्रार केली आहे.

(३) दादर पश्चिमकेडील प्लाझा सिनेमाजवळील छाप्रा इमारतीचा विकासक आर्थिक घोटाळ्यांमुळे तुरुंगात असल्याने सदर इमारतीच्या पुनर्विकासाचे काम मागील ३ ते ४ वर्षांपासून बंद आहे. तर हाय राईस समितीचे ना हरकत प्रमाणपत्र, बांधकाम क्षेत्रफळ २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यामुळे केंद्रीय पर्यावरण व वन विभाग (MOEF)ची परवानगी घेणे, हेरिटेज कमिटीची परवानगी, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करमणुकीची मैदाने (RG) ही तळ मजल्यावर देणे बंधनकारक असल्यामुळे आराखड्यात बदल करावे लागणे, मेट्रो रेल्वे बाजुने जात असल्यामुळै मेट्रो रेल्वेची परवानगी, त्यामुळे फाऊंटेशन डिसाईन मध्ये बदल या सर्व कारणांमुळे सेवाभवन जवळील बाळकृष्ण सदन, सारा मॅन्शन, सिध्दपुरा, कुथार्डा मॅन्शन या उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे काम रखडले आहे.

दादर येथील पुनर्विकासाचे काम रखडलेल्या इमारतींमधील रहिवाशी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या इमारतीमधील रहिवाशी, विकासक व लोकप्रतिनिधी यांचेसोबत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दि.२३.५.२०१६ रोजी बैठक घेतली आहे. छाप्रा इमारतीच्या विकासकाने रहिवाशांचे प्रलंबित भाडे देण्याकरीता त्यांच्यावतीने गुंतवणूकदार उभे केल्याचा व प्रकल्प पुर्ण करण्याकरीता भाडेकरु/रहिवाशांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येत असल्याचे मंडळास

कळविलेले आहे. तर सेना भवन जवळील बाळकृष्ण मेन्शन, सारा मेन्शन, सिध्दपुरा व कॅथर्डा मेन्शन या इमारतीच्या विकासकाने तांत्रिक अडचणमुळे प्रकल्पास विलंब झाल्याचे मान्य करुन प्रकल्प जलदगतीने पुर्ण करणार असल्याचे आश्वासन दिलेले आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प किती कालावधीत पुर्ण करणार याबाबत लेखी कळविणे तसेच रहिवाशांचे थकीत भाडे त्वरीत अदा करण्याबाबत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेव्दारे विकासकास सूचना देण्यात आल्या आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देऊळगावराजा (जि.बुलढाणा) नगरपालिका हद्दीतील संजयनगर भागातील घरकुलांबाबत**

**(१०) ५६७४२ (२९-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) नगरपालिका हद्दीतील संजयनगर भागात २१० मंजूर घरकुलांपैकी ५५ घरकुलांची कामे पूर्ण झाली असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित १५५ घरकुलांचे काम अर्धवट असुन अर्धवट अवस्थेतील घरकुले गुंड व भुरट्या चोरटयांची आश्रयस्थाने झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०१-२०१७) :**(१),(२),(३) व (४) देऊळगाव राजा नगरपरिषदेतंर्गत केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमतंर्गत (IHSDP) अंतर्गत संजयनगर येथील ५०९, पिंपळनेर १३८, फुकटपुरा १०२ अशा एकूण ३ झोपडपट्टयामधील ७४९ घरकुलांच्या प्रसतावास दिनांक १०.१२.२००८ रोजी केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीने (CSMC) ने मान्यता दिली आहे. मात्र सदर प्रकल्पास एकुण १९३ घरकुलांवर सिमित करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक २७.१०.२०१५ रोजी मान्यता दिली आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रु.लाखात)**

| प्रकल्प किंमत | मंजूर अनुदान (हिस्सा) | | वितरीत अनुदान (हिस्सा) | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | केंद्र | राज्य | केंद्र | राज्य | |
| ४६२.८९ | २९८.०६ | १४८.८२ | ६४४.४० | १२०.३४ | ७६४.७४ |

मुख्याधिकारी, देऊळगाव (राजा) यांनी सादर केलेल्या सुधारित प्रकल्प अहवालानुसार (DPR) एकुण १९३ घरकुलांपैकी ८६ घरकुले प्रगतीपथावर असून उर्वरित १०७ घरकुलांचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही. सदर प्रकल्पावर आजमितीस रु.११२.७९ लक्ष इतका खर्च झालेला

आहे. उर्वरित १०७ घरकुलांचे बांधकाम लाभार्थ्यांकडून करून घेण्याबाबत दिनांक १८.३.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.७ अन्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार लाभार्थ्यांकडून घरकुले तयार करून घेण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तसेच अर्ज मागविण्यासाठी दिनांक २४.३.२०१६ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात (अकोला आवृत्ती) मध्ये जाहिरात सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाकरिता नगरपरिषदेस रु.७ कोटी ६४ लाख इतका निधी प्राप्त झाला असून रु.१ कोटी १२ लाख इतका खर्च झालेला आहे. प्रकल्प सिमित झाल्याने अखर्चित निधीपैकी केंद्र शासन हिस्सा रक्कम रु.३ कोटी १२ लक्ष व राज्य शासन हिस्सा रु.१० लक्ष असे एकुण रु. ३ कोटी २२ लक्ष इतका निधी शासनास दिनांक १७.६.२०१५ रोजी परत केला असलयाचे मुख्याधिकारी, देऊळगावराजा नगरपरिषद यांनी कळविले आहे.

---

**पैठण औद्योगिक वसाहतीमधील १० इमारती विक्री विना पडून असल्याबाबत**

**(११) ५६९१४ (२९-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) औद्योगिक वसाहतीमध्ये औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने सर्व सुविधांसह बांधलेल्या १० इमारती भरमसाठ किंमतीमुळे विक्रीविना पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमधील एका फ्लॅटची किंमत किती ठेवण्यात आली आहे व सदर फ्लॅट ग्राहकांना परवडतील अशा किंमती ठरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत पैठण, जि.औरंगाबाद येथअल्प उत्पन्न गटांतर्गत १० इमारतीमध्ये एकूण १६० सदनिकांचे बांधकाम डिसेंबर २०१३ अखेर पूर्ण करण्यात आले. १६० सदनिकांपैकी २ सदनिकांचे पात्र लाभार्थींना वाटप करण्यात आले.

(२) व (३) म्हाडाच्या प्रचलित विक्री किंमती विषयक धोरणानुसार रु.१२,०३,१००/- प्रति सदनिका किंमत निश्चित करण्यात आली व गाळे विक्रीसाठी दि.०७.१०.२०१३ रोजी पहिली जाहीरात देण्यात आली. तथापि, पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर दि.२७.०२.२०१४ व दि.२८.०४.२०१४ रोजी अनुक्रमे दुसरी व तिसरी जाहीरात दण्ेयात आली. तरी देखील नागरीकांचा पुरेसा प्रतिसादर मिळाला नाही. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ठराव क्र.६६६० व ६६६४ अनुक्रमे दि.२२.०५.२०१४ व दि.२२.०७.२०१४ नुसार विक्री किंमतीमधील प्राप्त होणारा नफा, व्याजदर, व्यवस्थापकीय खर्च, आकस्मिक खर्च इ. बाबीची टक्केवारी कमी करण्याबाबत निर्णय घेण्या आला. या अनुषंगाने गाळ्यांची विक्री किंमत परिगणीत करण्यात आली त्यामध्ये कंत्राटदारास द्यावी लागणारी भाववाढ काही प्रमाणात सिमीत करण्यात

आली. त्यानुसार सुधारित विक्री किंमत रु.११,८८,०००/- प्रति सदनिका निश्चित करण्यात आली व कमी केलेल्या विक्री किंमतीनुसार दि.२१.८.२०१४ रोजी प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जाहिरात देण्यात आली. तथापि, त्यामध्ये एकही अर्ज प्राप्त झाला नाही. वरीलप्रमाणे सर्व जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र ठरलेल्या २ लाभार्थींना गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित १५८ सदनिकांपैकी ५४ सदनिका विकत घेण्यासाठी पोलीस विभागाकडून मागणी प्राप्त झाली असून संबंधित विभागास पैठण येथील सदनिका वितरीत करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीमध्ये प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वितरण चालू आहे.

---

**नाशिक शहर सिडको विभागातील ११ प्रभागांतील नाले व ड्रेनेजबाबत**

**(१२) ५७१०४ (२९-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर सिडको विभागातील ११ प्रभागांतील नाले व ड्रेनेजबाबत सिडको प्रशासनाकडे आतापर्यंत १५ हजार तक्रारी करुनही या तक्रारींचे प्रत्यक्षात निवारण होत नसल्याचे, माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हनुमान मंदिराच्या मागे, पाथर्डी फाटा, वासनगर, स्वामी विवेकानंदनगर, शिवशक्ती चौक, हेडगेवार नगर येथील रस्त्यावर नाल्याचे पाणी वाहत असल्याने तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

नविन नाशिक (सिडको) विभागाककडे दि.६.५.२०१३ ते दि.२७.७.२०१६ पर्यंत ड्रेनेजबाबत प्राप्त १७०५६ तक्रारींपैकी १७०१० तक्रारीचे निवारण करण्यात आले असून ४६ तक्रारीचे निवारण करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील विमानतळाच्या विस्तारिकणासाठी संपादित जमीनीच्या मोबदल्यात शेतकऱ्यांना जमीन देण्याबाबत**

**(१३) ५७१२० (२९-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील विमानतळाच्या विस्तारिकणासाठी सन १९९३ मध्ये मुर्तीजापूर मुकुंदवाडी येथील ५० शेतकऱ्यांची ५५ एकर जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने व सिडकोने संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीनी संपादित करताना त्यांच्याशी केलेल्या करारानुसार तत्कालीन शासनाने आदेश दिलेले असतांनाही शेतकऱ्यांना १२.५० टक्के विकसीत जमीन अद्याप देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे. सिडकोने मौजे मुकुंदवाडी येथील सिडकोसाठी संपादित केलेल्या जमीनीपैकी ३०.८९ हेक्टर आर जमीन विमानतळ विस्तारीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विमानतळ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने सिडको अधिसूचित क्षेत्रातील १४.१४ हेक्टर आर व सिडको अधिसूचित क्षेत्राबाहेरील २०.५४ हेक्टर आर अशा एकूण ३४.६८ हेक्टर आर जमीनीचे संपादन विमानतळ विस्तारीकरणासाठी केले आहे.

(२), (३) व (४) सिडकोच्या धोरणानुसार मौजे मुकुंदवाडी येथील ज्या जमीनींचे संपादन सिडकोसाठी करण्यात आले होते व ज्या जमीनी विमानतळासाठी हस्तांतरीत केल्या होत्या अशा समिनीच्या पात्र लाभधारक शेतक-यांना १२.५० टक्के योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. जी जमीन सिडकोने अधिग्रहीत केलेली नाही अशा शेतक-यांना सिडकोच्या धोरणानुसार १२.५० टक्के योजनेचा लाभ देता येत नाही.

---

### वसई-विरार महानगरपालिकेची ठेकेदारांनी २०० ते २५० कोटी रुपयांची लूट केल्याबाबत

**(१४) ५७१३४ (२९-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या पाच प्रभाग समित्यांसाठी २२ ठेकेदारांकडून ३३७१ विविध कर्मचाऱ्यांच्या करण्यात आलेल्या नेमणूकींद्वारे ठेकेदारांनी पाच वर्षात महानगरपालिकेची २०० ते २५० कोटी रुपयांची लूट केल्याची बाब माहिती अधिकारातून माहे मार्च, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त सतीश लोखंडे यांनी नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार २८४४ कर्मचाऱ्यांची कपात केली असता एका वर्षाअखेर महानगरपालिकेची ४४ कोटी रुपयांची बचत झाल्याचे सिध्द झाल्याने ठेकेदारांनी महानगरपालिकेला फसविल्याचे निदर्शनास येऊनही, संबंधित ठेकेदारांविरोधात कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन ठेकेदारांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :**(१) सन २०१४-१५ मध्ये १७ ठेकेदारांकडून ३३८४ इतक्या कर्मचा-यांची ठेका तत्वावर नेमणूक केली होती, ही वस्तुस्थिती आहे. यावर वार्षिक सुमारे रुपये ३४.८५ कोटी इतका खर्च झाला आहे.

(२) महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे व खर्चात बचत करणे, यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्तरावर गठित समितीने मंजूर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त कर्मचारी कपात करावेत अशी शिफारस केली व तद्नुषंगाने २५८२ ठेका कर्मचा-यांची कपात करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनास चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक ११.०७.२०१६ रोजी देण्यात आल्या.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली तालुक्यात (जि.रत्नागिरी) असणाऱ्या शिपर्या कंपनीमध्ये कामगारांना १० महिन्यापासून विनावेतन राबवून घेतल्याबाबत**

**(१५) ५८१६२ (२९-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यात (जि.रत्नागिरी) असणाऱ्या शिपर्या कंपनीमध्ये शेकडो कामगारांना १० महिन्यापासून विनावेतन राबवून घेतल्याने त्याच्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी हे भुमिपुत्र व प्रकल्पबाधित असल्याने शासनाने कर्मचाऱ्यांचे वेतन का थांबवण्यात आले याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

रत्नागिरी कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी यांनी चौकशीअंती संबंधित कंपनीविरुध्द वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अंतर्गत निरीक्षण शेरे पारीत केले होते. निरीक्षण शे-यातील त्रुटीची पूर्तता न केल्याने अधिनियमांतील तरतुदींचा भंग केल्याबद्दल व्यवस्थापनाविरुध्द मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सुवेज पंपिंग स्टेशनसाठी ५५ लाखांचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढल्याबाबत**

**(१६) ५८३६४ (२९-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दसरा चौक (जि.कोल्हापूर) परिसरातील जयंती नाला येथे सुवेज पंपिंग स्टेशनसाठी ११ के.व्ही. दाबाच्या वीज कनेक्शन एक्सप्रेस फिडरसह लोड वाढविण्यासाठी वीज मंडळाने २५ लाखांचे अंदाजपत्रक तयार केलेले असतांना महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने त्याच कामासाठी ५५ लाखांचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढल्याचे माहे मे,२०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

जयंती नाला येथील सुवेज पंपींग स्टेशनसाठी ११ के.व्ही वीज दाबाच्या एक्सप्रेस फिडरसह लोड वाढविण्यासाठी वीज मंडळाने तयार केलेल्या २५ लाखाचे अंदाज पत्रक सन २०१२-१३ च्या कॉस्ट डाटा नुसार तयार केले होते.

सदरच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१३-१४ च्या सुधारीत दर सूचीनूसार रु.५५.०० लाख किंमतीची निविदा महानगरपालिकेने काढलेली होती.

तथापी याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सुचनेनूसार महावितरण कंपनीच्या चालू दर सूचीनूसार रु.२७.५८ लाख रुपये इतकी अंदाजपत्रकीय रक्कम महावितरण कंपनीकडे भरुन काम करुन घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमिक कामगार निरीक्षक यांनी नियमबाहयपणे कामगारांच्या नोंदी केल्याबाबत

**(१७) ५९२१४ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमिक कामगार निरीक्षक, चिंचवड, पुणे १९ यांनी शासनाची व कंपनीची फसवणूक करून प्रतिक इंटरप्राईझेस, कुरुळी (जि.पुणे) या कंपनीत नियमबाहयपणे बाहेरील कामगारांच्या नोंदी केल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर कंपनीने महामंडळास दिनांक ४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०७-१२-२०१६)** :(१) हे खरे नाही. सदर कंपनीत कार्यरत असलेल्या अनोंदित माथाडी कामगारांची व मालकाची नियमानुसार नोंदणी केली आहे.
(२) व (३) होय. तथापि, सदर कंपनीत कार्यरत माथाडी कामगारांचे वेतन व लेव्ही मालकाने मंडळात जमा केली नाही. यास्तव, मंडळाच्या वसुली नोटीसला अनुसरुन निवेदन दिले आहे. सदर मालकाने अधिनियमाच्या तरतूदीचा भंग केला आहे. सबब, अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्च उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण येथील वालधुनी विकास प्राधिकरणाची केलेली घोषणा**

**(१८) ५९२८४ (२९-०८-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तसेच आसपासच्या परिसरात सन २००५ साली आलेल्या महापुरात मोठे नुकसान तसेच जीवितहानी झाली होती, असल्यास, भविष्यात हे टाळण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी वालधुनी विकास प्राधिकरणाची घोषणा केली होती सदर प्राधिकरण अस्तित्वात नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे प्राधिकरण स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०१६)** :(१) व (२) वालधुनी नदीचा जलद विकास करण्याकरीता संबंधित महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्यामध्ये योग्य तो समन्वय घडवून आणणे व योग्य ते मार्गदर्शन करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक सूचना-२१०८/प्र.क्र.३१/नवि-७ दिनांक २४ जून, २००८ अन्वये एका समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. तथापि, वालधुनी नदीसाठी कोणत्याही प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल रेल्वे स्थानकाच्या परिसरात पोलीस चौकी उभारण्याबाबत**

**(१९) ५९४१३ (२६-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) रेल्वे स्थानकाच्या परिसरात वाढते अतिक्रमण व वाढत्या चोऱ्यांना आळा बसण्यासाठी पूर्व बाजूकडे पोलीस चौकी उभारण्याची मागणी गृह विभागाने सिडको प्रशासनाकडे सन २०१२ मध्ये केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ वर्षे उलटुनसुद्धा सिडकोच्या नियोजन विभागाने उक्त चौकी उभारण्यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) सिडकोकडून पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पोलीस चौकीकरीता नवीन पनवेल (पूर्व) सेक्टर-१७ येथील भूखंड क्र.१२ अ, क्षेत्रफळ २५.०० चौ.मी.चे वाटपपत्र दिनांक ४.११.२०१६ रोजी देण्यात आले आहे.

---

### राज्यातील विशेषतः भिवंडी-निजामपूर महापालिका हद्दीतील पेयजल कराबाबत

**(२०) ५९४९७ (२९-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः भिवंडी-निजामपूर महापालिका हद्दीतील पेयजल करामध्ये वाढ करण्याबाबत केलेला विरोध तसेच महापालिका क्षेत्रातील दुर्गम प्रभागांना पेयजलाचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत मुस्लीम अल्पसंख्यांक बरोबरच समाजातील अन्य समूह घटकांच्या धुरिणांनी, समाजसेवकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. राज्यमंत्री (नगरविकास), मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (नगरविकास) तसेच महानगरपालिकेच्या संबंधित महापालिका प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) सन २०१६-१७ च्या महासभेत पाणीपट्टी दरांत सुधारणा करणेकामी ठराव क्र.१९९ दिनांक ३०.०३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात आला होता. मात्र सदर ठरावास नगरसेवक, नगरसेविका व पदाधिकारी यांचेकडून तीव्र विरोध झाल्यामुळे महापौर यांचे दालनात दिनांक १४.०६.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत महापौर यांनी सदर ठरावास तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील म्हसळा नगरपंचायतीचा घनकचरा**
**जानसई नदीपात्रात टाकण्यात येत असल्याबाबत**

**(२१) ६०१३३ (२९-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील म्हसळा नगरपंचायतीचा घनकचरा शहरानजीकच्या जानसई नदीपात्रात टाकण्यात येत असल्यामुळे नदीतील पाणी दुषित होऊन शहरातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणेबाबत मुख्याधिकारी यांना एक निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी महापालिका हद्दीत नऊ बेकायदा शाळा असल्याबाबत**

**(२२) ६०२७१ (२९-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महापालिका हद्दीत नऊ बेकायदा शाळा असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिकेच्या शिक्षण मंडळाने शाळा बंद करण्याबाबत माहे मे, २०१६ च्या सुमारास नोटीसा दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोटीसा देऊनही शाळा सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नऊ शाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :**(१) महानगरपालिका शिक्षण मंडळाने महानगरपालिका हद्दीत माहे मे, २०१६ च्या सुमारास १० बेकायदा शाळांना नोटीसा दिल्या आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) बेकायदारित्या सुरु असलेल्या १० शाळांचे संस्था चालकांना दिनांक १२ मे, २०१५ रोजी अनधिकृत शाळा बंद करून शाळेमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांना/बालकांना शासन मान्यता प्राप्त शाळेत प्रवेश करून देणेबाबत नोटीस देण्यात आलेल्या होत्या.

तसेच पालकांनी अनधिकृत शाळेत प्रवेश घेण्यात येऊ नये याकरिता माहे मे, २०१५ मध्ये विविध दैनिक वृत्तपत्रांमध्ये तसेच साप्ताहिकांकध्ये जाहिर सुचना प्रसिध्दी देण्यात आलेली होती. याप्रमाणे कार्यवाही करून सुध्दा अनधिकृत शाळा बंद न केल्याने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (२००९ चा ३५) च्या कलम ३६

प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन या अधिनियमाच्या कलम १३ चे पोट कलम (५) आणि कलम १९ चे पोट कलम (५) च्या अनुषंगाने नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

(४) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात ४ बेकायदा शाळा निदर्शनाला आल्या असून यापूर्वीच्या मागील वर्षातील १० अशा एकूण १४ बेकायदा सुरु शाळांपैकी ०३ शाळांना शासनाकडून परवागनी देय केली असुन या ३ शाळांना स्वयंअर्थ साहाय्यिता तत्वावर मान्यता मिळालेली आहे. उर्वरित ११ बेकायदा शाळांवर नोटीसा देऊन नियमानुसार कायदेशीर कारवाई प्रगतीपथावर आहे.

---

**राजगुरूनगर नगरपरिषद (जि.पुणे) येथे रहिवासी वापराच्या बांधकामास परवानगी देताना झालेल्या बदलाबाबत**

**(२३) ६०४६६ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरूनगर नगरपरिषद (जि.पुणे) येथे रहिवासी वापराच्या बांधकामास परवानगी देणेकामी बदल होत असल्याने जमिनीच्या किंमतीत ३०% रक्कम शासन जमा करत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन ३०% रक्कम घेत असल्याने घरांच्या किंमतीत वाढ होऊन सामान्य ग्राहकांना घर घेणे परवडत नसल्याने ३०% रक्कम रद्द करण्यात यावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना माहे जून, २०१६ वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षेत्र बदल करण्याकरिता अतिरिक्त घेण्यात येणारी रक्कम रद्द करणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१७) :**(१) व (२) होय.

राजगुरुनगर नगरपरिषदेची स्थापना दिनांक १४.८.२०१४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे झाली आहे. त्यापुर्वी त्या ठिकाणी प्रादेशिक योजना पुणे जिल्हयाची नियमावली लागू होती. राजगुरुनगर नगरपरिषदेची स्वतंत्र विकास योजना तयार झाली नसल्याने अद्यापही तेथे प्रादेशिक योजनेची नियमावली लागू आहे. प्रादेशिक योजनेमध्ये जमिनीचा वापर बदल करतांना ३०% अधिमुल्य घेण्याची तरतूद असल्याने ती सध्या राजगुरुनगर परिषदेला लागू आहे.

(३) शासनस्तरावर प्रादेशिक योजनेच्या नियमावलीत बदल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) लागू होत नाही.

---

## सिडकोने अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई सुरू केल्याबाबत

**(२४) ६०५६६ (२६-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामाच्या विरोधात कारवाई सुरू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामाचा प्राप्त अहवाल व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये तफावत असल्याने बऱ्याच वेळा सिडकोला माघार घ्यावी लागली आहे, तसेच, अनधिकृत बांधकामाविरोधात कारवाई करण्यासाठी सिडकोकडे आवश्यक साधनसामुग्री व मनुष्यबळ नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैरफायदा घेवून भूमाफीयांनी नैना प्रकल्पासह अन्य सिडको क्षेत्रात अनधिकृत बांधकामे उभारली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याची कार्यवाही करण्यासाठी मासिक कार्यक्रम पोलिस आयुक्त यांच्याकडून पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात येते व असे अनधिकृत बांधकाम विभागाकडून निष्कासित करण्यात येते.

(४) अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये नोटीस बजावण्याची व निष्कासनाची कारवाई केली जाते. दिनांक १.१.२०१३ नंतरच्या अनधिकृत बांधकामांना वरीलप्रमाणे नोटीस बजावून आतापर्यंत एकूण ३०२३ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र ग्रामदान नवनिर्माण समितीला (भूदान समिती) महाराष्ट्र शासनाने दिलेल्या जमिनीबाबत

**(२५) ६०६०७ (२९-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडेवहाळ व आजूबाजूच्या गावातील (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महाराष्ट्र ग्रामदान नवनिर्माण समितीला (भूदान समिती) आचार्य विनोबा भावे यांच्या संकल्पनेनुसार उद्योग, शैक्षणिक, सामाजिक उपक्रम आदिसाठी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या जमिनीपैकी सिडकोने नवी मुंबई विमानतळासाठी जमिन संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने महाराष्ट्र ग्रामदान नवनिर्माण समिती (भूदान समिती) ची जमीन संपादित केल्यानंतर त्या बदल्यात समितीच्या नावाने जमिनी न देता इतर व्यक्तिच्या नावे जमिनी वाटप करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संपादित केलेल्या जमिनीच्या बदल्यात समितीच्या नावाने जमिनी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१७) :**(१) नवी मुंबई विमानतळासाठी मौजे कुंडेवहाळ स.नं.७३/१ अ, क्षेत्र ८-५९-० हे.आर व स.नं.८४/अ, ३-२०-० व ८४ ब क्षेत्र २-००-० हे आर.ही भूदान समितीशी संबंधित जमीन सिडकोने संपादित केली आहे.
(२), (३) व (४) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादित करण्यात आलेल्या जमीनीपोटी २२.५% योजनेअंतर्गत भूदान समितीशी संबंधित लाभार्थ्यांना भूखंड वाटप पात्रतेसाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांचेमार्फत निवाडे घोषित करण्यात आले असून सिडकोने सोडतीद्वारे भूखंड निश्चित केले असून अद्याप वाटपपत्र देण्यात आलेले नाहीत. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक १३.७.२०१६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून सदर प्रकरणी पुन:तपासणी करण्यात येत आहे.

---

**विकास आराखड्यातील आरक्षणाच्या मोबदल्यात दिल्या जाणाऱ्या टीडीआर वरील निर्बंधाबाबत**

**(२६) ६१२८१ (२६-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विकास आराखड्यातील आरक्षणाच्या मोबदल्यात दिल्या जाणाऱ्या हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) वापरासाठी असलेले क्षेत्रफळाचे बंधन काढून दिलासा दिला असतानाच नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील टीडीआर वापरण्यावरील निर्बंध कायम ठेवण्यात आल्याचे माहे मे, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सहा मीटर रस्त्यावर टीडीआरचा वापर करता येणार नसल्याने, पुण्यातील छोट्या सोसायट्यांच्या पुनर्विकासाचा प्रश्न निर्माण होऊन नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील टीडीआर वापरण्यावरील निर्बंध काढुन टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०१६) :**(१) होय.

(२) अशी परिस्थिती नाही. सोसायटींचा पुर्नविकास करतांना विद्यमान ६ मी.रस्त्यास दोन्ही बाजूने रस्ता रुंदी प्रस्तावित करुन ९ मी.रुंदी केल्यास नियमानुसार ९ मी. रस्त्यावर टिडीआर अनुज्ञेय होईल.

(३) उक्त बाब विचारात घेता कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

(४) लागू नाही.

---

**औरंगाबाद शहराचा पर्यावरण अहवाल सादर करण्यात आला नसल्याबाबत**

**(२७) ६१३०० (२९-०८-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरामध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महापालिका प्रशासनाने दरवर्षी पर्यावरणाचा आढावा घेणे अपेक्षित आहे मात्र मागील दोन वर्षापासुन शहराचा पर्यावरण अहवाल सादर करण्यात आलेला नाही, तसेच यापुर्वीच्या अहवालातील सुचनांची देखील अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात किमान ३३ टक्के झाडांची आवश्यकता असतांना केवळ ५ टक्के झाडे (ग्रीन कव्हर) उरली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणाचा समतोल राखण्यात औरंगाबाद महापालिकेकडून दुर्लक्ष केले जात आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, औरंगाबाद शहराचा पर्यावरण समतोल राखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरामध्ये पर्यावरण समतोल राखण्यासाठी सन २०१३-१४ या वर्षीचा पर्यावरण अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन प्रसिध्द करण्यात आला आहे. सन २०१५-१६ या वर्षाचा पर्यावरण अहवाल तयार करण्यात आला असून सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील घरेलू व बांधकाम कामगारांबाबत**

**(२८) ६१३०५ (२९-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरेलू व बांधकाम कामगारांची नवीन नोंदणी व नुतनीकरण होत नसल्याने या कामगारांना घरेलू कामगार व बांधकाम कामगार योजनेचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम कामगारांची नोंदणी व इतर अनूषंगिक कामे बाह्ययंत्रणेकडून करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मंडळ/शासन स्तरावर विचाराधीन आहे. हे ही खरे आहे काय,
(३) तसेच घरेलू कामगार कल्याण मंडळाचे कामकाज पाहण्यासाठी अतिरिक्त १५९ पदे निर्मितीच्या शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहययंत्रणेची नियुक्ती करणे महाराष्ट्र ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विचाराधीन आहे.
(३) व (४) घरेलू कामगार कल्याण मंडळाचे कामकाज पाहण्यासाठी सुधारीत आकृतीबंधानुसार प्रस्ताव विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे कडून मागविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी शहराला वारणा नदीतुन पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचा अमृत योजनेत समावेश करण्याबाबत

**(२९) ६१३९५ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी शहराला वारणा नदीतुन पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचा केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या सन २०१५-१६ च्या आराखडयात समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाला अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पाच्या कामाचे कार्यादेश दिल्यानंतर सदर प्रकल्पासाठी निधी वितरीत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण योजनेच्या नियमावलीसाठी माजी अप्पर सचिव गौतम चटर्जी यांची समिती नियुक्त केल्याबाबत

**(३०) ६१६२० (२९-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण योजनेच्या नियमावलीसाठी माजी अप्पर सचिव गौतम चटर्जी यांची एक सदस्यीय समिती शासनाने नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एक सदस्यीय समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यावर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर अहवाल किती कालावधीत प्राप्त होणे अपेक्षीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०१-२०१७) :**(१), (२), (३) व (४) संसदेने अधिसंमत केलेला The Real Estate (Regulaation & Development) Act.२०१६ कैंद्र शासनाने दिनांक २६.०३.२०१६ रोजी अधिसूचित केला आहे. The Real Estate क्षेत्रात ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या तक्रारींचा त्वरेने निपटारा करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपीलीय न्यायाधिकरणाची स्थापना करणे उपरोक्त अधिनियमात अंतभूत आहे. त्याअनुषंगाने राज्यांमध्ये सदर अधिनियम अंमलात आणण्याच्या दृष्टीने नियम ८४ खाली नमूद केलेल्या प्रत्येक मुद्याचा अभ्यास करुन राज्य शासनातर्फे तयार करण्यात येणा-या नियमांकरीता सूचना करण्यासाठी श्री.गौतम चॅटर्जी, भा.प्र.से. (निवृत्त) यांनी विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने त्यांचेकडून प्रारुप नियम प्राप्त झाले असून ते शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

## सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील शेकडो भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३१) ६१७६८ (२६-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेचे शेकडो भूखंड दुर्लक्षित राहिल्यामुळे त्यांच्यावर अतिक्रमण झाले असुन अनेक भूखंड इतर व्यक्तींच्या व संस्थांच्या नावावर लागले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडांच्या मालकीची सिटी सर्व्हे व ७/१२ ला महानगरपालिकेची नोंद नसल्यामुळे यातील अनेक भूखंडाचे परस्पर व्यवहार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाला कोटयावधी रुपयाचा फटका बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा भूखंडाची नेमकी संख्या किती आहे तसेच या भूखंडांच्या सुरक्षितेसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या भुखंडावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यावर त्यावर वळोवेळी कार्यवाही करून अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे.

सर्व्हे क्र.५४९/१/२ प्लॉट क्र.१७ सिटी सर्व्हे क्र.११५६२ ते ११५६७ सुतार प्लॉट सांगली येथे नव्याने पत्राची शेड उभे करून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करत असतांना संबधितांनी कोर्टात रिट याचिका दाखल केली. त्यावर मा.न्यायालयाने अतिक्रमण काढण्यास स्थगिती दिली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्रधान मंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या मंजुरीबाबत

**(३२) ६१८६९ (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालीकेद्वारे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर करण्याचा प्रस्ताव माहे मार्च, २०१६ मध्ये शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी प्रदान केली आहे काय,

(३) असल्यास, या योजनेस मिळणारा निधी केव्हा पर्यत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१२-०१-२०१७) :**(१), (२), (३) व (४) अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक क्र. ३ खाजगी भागीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP) तसेच घटक क्र. ४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) मध्ये अनुक्रमे ८६० व ६१५८ घरकुले अशा एकूण ७०१८ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) ने काही अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता दिलेली असून या २ प्रकल्पांची किंमत रु. ३३९२२.०० लक्ष इतकी आहे. त्याबाबतची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे -

(रक्कम रु.लक्ष)

| घटक | घरकुले | हिस्सा | | केंद्र शासनाचा १ ला हप्ता ४०% | |
|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | केंद्र | राज्य |
| घटक-३ | ८६० | १२९०.०० | ८६०.०० | ५१६.०० | ३४४.०० |
| घटक-४ | ६१५८ | ९२३७.०० | ६१५८.०० | ३६९४.८० | ३४६३.२० |
| एकूण | ७०१८ | १०५२७.०० | ७०१८.०० | ४२१०.८० | २८०७.२० |

केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने उपस्थित केलेल्या अटींची पुर्तता करण्याची कार्यवाही अमरावती मनपाकडून सुरु आहे. तसेच घटक क्र. ४ मधील एकूण ६१५८

घरकुलांकरिता केंद्र शासन हिस्सा रक्कम रु. ३६.९४८ कोटी (१ हप्ता मंजूर अनुदानाच्या ४०%) इतका निधी राज्य शासनास दि. २९.९.२०१६ रोजी वितरीत केला असून सदरचा निधी म्हाडामार्फत अमरावती मनपास वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सर्वांसाठी घर सन २०२२ पर्यंत या कोल्हापूर शहरातील योजनेबाबत**

**(३३) ६२०४१ (२९-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वांसाठी सन २०२२ पर्यंत घर या योजनेसाठी कोल्हापूर शहरात २५ हजारांहून अधिक अर्ज विक्री झाली असून केवळ ३ हजार अर्ज माहे मे, २०१६ च्या सुमारास सादर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थींना लाभासाठी लागणारी कागदपत्रे गोळा करण्याची प्रक्रिया क्लिष्ट आहे तसेच या कागदपत्रांसाठी तेथील शासकीय कर्मचारी आर्थिक मागाणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना सुलभ होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२५-११-२०१६) :**(१) व (२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सर्वांसाठी घरे २०२२ या सकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात प्रभावीपणे अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंत्रिपरिषदेच्या मान्यतेने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार सदर योजना नागरी भागात ४ घटकात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामध्ये ५१ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. घटक क्र.१ नुसार ज्या जागेवर झोपडीधारक राहत आहेत त्या जागेवर (In-situ) पध्दतीने झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याने कोल्हापूर महानगरपालिकेने ६२ झोपडपट्टयाचे सर्वेक्षण सुरु आहे. या सर्वेक्षणांतर्गत एकूण २१,३२४ अर्जाची विक्री झालेली असून माहे मे, २०१६ अखेर ४१४९ अर्ज प्राप्त झाले आहेत. उर्वरित घटकांपर्गत मागणी सर्वेक्षणासाठी विहित कार्यपध्दत कोल्हापूर महानगरपालिकेकडून अवलंबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रधानमंत्री आवास योजनेच्या मागणी सर्व्हेक्षणासाठी कोल्हापूर महानगरपालिकेने शहरात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून नागरिकांच्या सोईस्तव ५ नागरी सुविधा केंद्रामध्ये योजनेचे अर्ज उपलब्ध करण्यात आले होते. तसेच इच्छुक अर्जदारांना महसूल विभागाच्या समन्वयाने दिनांक ५ व ६ मे, २०१६ रोजी दाखले उपलब्ध करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे इच्छुक अर्जदारांना काही कागदपत्रे उपलब्ध करण्यास विलंब होत असल्यास, ती जमा करण्यासाठी अर्जदारांना १५ दिवसांचा अवधी देण्यात आला होता.

---

## चाकण औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यानी कामगारांना काढून टाकल्याबाबत

**(३४) ६२८४३ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या कामगारांना सहा महिने कामावर ठेवून पुन्हा काढून टाकत असल्याने नैराश्य येऊन कामगारांच्या आत्महत्येत वाढ झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे-जून, २०१६ वा त्यासुमारास चाकण औद्योगिक क्षेत्रातील १२ कामगारांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

चाकण जिल्हा पूणे या औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या कामगारांना सहा महिने कामावर ठेवून पुन्हा काढून टाकत असल्याने नैराश्य येऊन, कामगारांनी आतम्हत्या केल्याबाबत या परिसरातरील चाकण, खेड व आळंदी पोलीस स्टेशनकडे चौकशी केली असता, अशाप्रकारच्या घटनांची नोंद नसल्याचे त्यांनी कळविले आहे. तसेच अशाप्रकारच्या तक्रारी कामगार उपायुक्त कार्यालय पुणे, जिल्हा पुणे व अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) तीन कायम कामगारांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.

(३) होय याबाबत चौकशी केलली आहे.

दोन कामगारांच्या वारसदारांना कायदेशीर देय रक्कम मिळवून देण्यात आली आहे. तथापि तिसऱ्या कामगारांची देय रक्कम अदा करण्यास वारसदारांबाबत वाद उत्पन्न झाल्यामुळे उपदान प्रदान अधिनियम, १९७२ चे कलम ७(४)(अ) नुसार उपदानाची रक्कम रु.३,४४,२५०/- प्रिसायडिंग ऑफिसर, लेबर कोर्ट, पुणे यांच्याकडे जमा करण्याबाबत कामगार आयुक्त यांनी निर्देशिले होते. त्याप्रमाणे संबधित व्यवस्थापनाने उपदानाची रक्कम रेखांकित धनादेशाद्वारे प्रिसायडिंग ऑफिसर, लेबर कोर्ट, पुणे यांच्याकडे १९.०८.२०१६ रोजी जमा केलेली आहे. तसेच या कामगारास देय असलेली सानुग्रह अनुदान रक्कम रु. १६,००,०००/- अशी एकुण रक्कम रु.१९,४४,२५०/- कामगारांच्या वारसदारास देण्यासाठी व्यवस्थपानाने कागदपत्रे सादर करण्यास संबंधितांना पत्राने कळविले असुन कागदपत्रांची पुर्तता होताच कायदेशिर देणे वारसदारास अदा करण्यात येईल. आस्थापनेविरुध्द विविध कामगार कायदयाखाली खटले दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नही.

---

### कापशी तलाव परिसरातील शासकीय जागेवर पर्यटनस्थळ विकसीत करण्याबाबत

**(३५) ६३३३२ (२६-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेने कापशी तलाव परिसरातील ग्रामपंचायत हद्दीमध्ये सुरु केलेले अवैध बांधकाम थांबवावे अशी नोटीस कापशी ग्रामपंचायत कडून अकोला महानगरपालिकेला दिनांक १६ जून, २०१६ रोजी बजावण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला महानगरपालिकेने कापशी तलाव परिसरातील शासकीय जागेवर पर्यटनस्थळ विकसीत करण्याच्या हेतुने रस्त्याच्या कामाकरिता ४५ लक्ष रुपये निधी मंजुर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पर्यटन स्थळ ग्रामपंचायतीने विकसीत करावे अशी स्थानिक ग्रामस्थांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) सदर तलाव व तेथील शेती महानगरपालिका अकोला यांच्या ताब्यात देण्यात आली होती. तेव्हापासून सदर जागेची व तलावाच्या देखभाल व दुरुस्ती अकोला महानगरपालिका करीत आहे.

या तलावाचे सौद्यीकरण करण्याकरीता पर्यटन विकास निधी अंतर्गत, जिल्हा नियोजन समिती सचिव तथा जिल्हाधिकारी यांनी रु.६५.०० लक्ष च्या कामांना प्रशासकीय मंजूरी दिली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) सदर पर्यटन स्थळ शासनाने विकसी करुन ग्राम पंचायतीला हस्तांतरीत करावे अशी ग्रामस्थांची मागणी आहे. असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद अकोला यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

### भिवंडी महानगरपालिकेकडे अनेक कारखान्यांची नोंद नसणे व नियोजित विकास आराखडा तयार करण्यास होणारा विलंब

**(३६) ६३४८७ (२६-०८-२०१६). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) मधील अनेक कारखान्यांची महानगरपालिकेकडे नोंद नसल्याची बाब माहिती आयुक्त यांनी माहे एप्रिल, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेकडून नियोजित विकास आराखडा तयार करण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब क्र. १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१४-२०१५ पासून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने, महानगरपालिका हद्दीतील कारखाने व व्यवसायधारक यांना व्यवसायक परवाना देणे करीता त्यांचे सर्व्हेक्षण, नोंदणीकरण व नुतनीकरण आणि त्या अनुषंगिक व्यवसाय परवाना देण्याचे काम ठेकेदारी पध्दतीने अटी शर्ती नुसार ५ वर्षाच्या कालावधी करीता देण्यात आलेला आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार कल्याण मंडळ कायद्याची माथाडी कायद्याच्या धर्तीवर पुनर्रचना करण्याबाबत**

**(३७) ६४२०३ (२९-०८-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार कल्याण मंडळ कायदा, २००८ मध्ये घरकाम हे काम आहे आणि त्यामुळे त्या कामात असलेली व्यक्ती घरकामगार आहे, हे गृहिततत्व मान्य करुन कामगार हक्क आधारीत घरकामगार मंडळ कायद्याची निर्मिती करावी तसेच प्रस्थापित कायद्याची माथाडी कायद्याच्या धर्तीवर पुनर्रचना करावी इत्यादी मागण्या नॅशनल डोमेस्टीक वर्कर्स वेल्फेअर ट्रस्ट आणि महाराष्ट्र घरकामगार युनियन मार्फत मा.मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, मा.कामगार राज्यमंत्री, मा.कामगार आयुक्त (मुंबई) यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कायद्यान्वये किमान वेतन, साप्ताहिक सुट्टी, आजारपणाची भरपगारी रजा, ग्रॅज्युअटी, मातृत्वलाभ आणि भविष्य निर्वाह निधी सारख्या कामगार हक्काचा लाभ ९५ टक्के घर कामगार महिलांना होत नसल्याची बाब निष्पन्न झाली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्थापित कायद्याची माथाडी कायद्याच्या धर्तीवर पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग २ व ३ प्रकरणी शासनामार्फत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०५-०१-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे. तथापि निवेदन दि.७/११/२०१६ रोजी प्राप्त झाले.

(२) घरेलु कामगार कल्याण मंडळामार्फत घरेलु कामगारांची वयाची ५५ वर्षे पूर्ण केली, अशा कामगारांना सन्मानधन योजनेअंतर्गत प्रत्येकी रु.१०,०००/- अंत्यविधी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कायदेशीर वारसास रु.२०००/- दोन अपत्यांपर्यंत प्रत्येक प्रसुती करीता रु.५०००/- आम आदमी विमा योजनेअंतर्गत:-

१) सदस्याचा नैसर्गिक मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास रु.३०,०००/-

२) अपघाती मृत्यू ओढवल्यास रु.७५,०००/-

३) अपघातामुळे कायम स्वरुपी संपूर्ण अपंगत्व ओढवल्यास सदस्यास रु.३७,५००/-

४) याशिवाय सदस्यांच्या मुलांना शिक्षणाकरीता शिक्षा सहयोग योजनेअंतर्गत इयत्ता ९ वी व १२ वी आय.टी.आय. कोर्स करीता दरवर्षी उत्तीर्ण होत असल्यास दर तिमाहीकरीता रु.३००/- इतकी शिष्यवृत्ती (जास्तीत जास्त दोन मुलांकरीता) असे उपरोक्त लाभ देण्यात येतात.

(३) महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार कल्याण मंडळ कायदा अस्तित्वात असल्याने प्रस्तावित कायद्याची माथाडी कायद्याच्या धर्तीवर पूनर्रचना करण्याची बाब तुर्तास विचाराधीन नाही.

(४) किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत घरेलु कामगार रोजगाराचा समावेश अनुसूचित उद्योगांच्या यादीत सामाविष्ट करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. तरी सदर रोजगार अनुसूचित उद्योगात समाविष्ट झाल्या नंतर घरेलु कामगारांसाठी किमान वेतन ठरविता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने घातलेल्या जाचक अटींबाबत

**(३८) ६४४६३ (२९-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने सुरक्षा रक्षक भरती होण्यासाठी वजन, उंची, व शिक्षण तसेच शारीरिक व मैदानी परीक्षेची पात्रता असे निकष लावले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकषामुळे मावळ तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गरजू व वर्षानुवर्षे सुरक्षा रक्षकाचे काम करणारे उमेदवार अपात्र ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदिवासी भागातील सुरक्षा रक्षकांना उत्पन्नाचे इतरत्र कोणतेही साधन नसल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मावळ तालुक्यातील आदिवासी भागातील सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत पात्रता निकष रद्द करून सुरक्षा रक्षकांना पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या अंतर्गत कायमस्वरूपी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-११-२०१६) :**(१) शासनाने सुरक्षा रक्षक भरतीचे पात्रता निकष दि.२.३.२००९, दि.२५.८.२०१० व दि.१७.१०.२०१३ अन्वये निर्धारित केले आहेत.
(२) होय, १४ उमेदवार अपात्र ठरले आहेत.
(३) नाही.
(४) नाही, अशी कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपळूण नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेल्या विरेश्वर तलावाच्या दुरवस्थेबाबत**

**(३९) ६४५१५ (२९-०८-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेल्या विरेश्वर तलावाचे काही कालावधीपूर्वीच सुमारे ४५ लाख रुपये खर्च करुन सुशोभीकरण करण्यात आले असूनही तलावाची अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावाचे पुनश्च सुशोभीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) विरेश्वर तलावाचे पुन:श्च सुभोभिकरण करण्याची आवश्यकता नाही. परंतु आवश्यक त्या ठिकाणी किरकोळ स्वरुपाची दुरुस्तीची काम नगरपरिषदेकडून करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हाडाच्या घरांच्या किमतीत वाढ झाल्याबाबत**

**(४०) ६५०५३ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडा (मुंबईच्या) गेल्या वर्षी काढलेल्या घरांच्या लॉटरीमध्ये मालवणी मालाड येथील २८ चौरस मीटर कार्पेट एरियाच्या घराची किंमत १८ लाख २२ हजार होती. यावर्षी याच ठिकाणच्या तेवढ्याच क्षेत्रफळाच्या घराची किमत २३ लाख ९९ हजार रुपये आहे असे दिनांक २५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गव्हाणपाडा, मुलुंड (मुंबई) येथील ४४.४७ चौरस मिटरच्या घरांची किमत गेल्यावर्षी ४६ लाख ६१ हजार होती, यावर्षी याच घरची किमत ५२ लाख ६० हजार रुपये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या घरांच्या किमती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी सुमारे रुपये १० हजार रुपये प्रती चौरस फुट व उच्च उत्पन्न गटासाठी सुमारे रुपये २० हजार रुपये प्रती चौरस फुट अशा असल्याने सामान्य गरीब, मध्यमवर्गीय नागरिकांना ही घरे न परवडणारी झाली असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०३-२०१७) :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सन-२०१५ मध्ये दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथील अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत २३२ सदनिकांची सोडत काढण्यात आली होती. सदरहू सदनिकांची विक्री किंमत रू.१८,२२,०५७/- इतकी काढण्यात आलेली असून सदरहू इमारत ७ मजली असून सदनिकेचे चटई क्षेत्र २८ चौरस मीटर इतके आहे. तर सन-२०१६ मध्ये काढण्यात आलेल्या ५४ घरांच्या सोडतीमध्ये म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार सदनिकांची विक्री किंमत रू. २३,९९,५००/- इतकी काढण्यात आलेली असून सदरहू इमारत २४ मजली असून सदनिकेचे चटई क्षेत्र २८.४२ चौरस मीटर इतके आहे.

सदरहू विक्री किंमतीतील फरक हा योजना, इमारती व सदनिकांचे विक्री किंमतींचे वर्ष हे भिन्न असल्यामुळे त्यामध्ये व्याजाचे भांडवलीकरण व इतर आकार यांचा समावेश झाल्याने येत आहे.

(२) सन-२०१५ मध्ये गव्हाणपाडा, मुलुंड (मुबई) येथील मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांपैकी १८५ सदनिकांची सोडत काढण्यात आली होती. सदरहू सदनिकांची विक्री किंमत रू.४६,६१,४००/- इतकी निश्चित करण्यात आली होती. तथापि, सदरहू १८५ गाळ्यांपैकी ३ गाळे हे शासन स्वेच्छाधिकार कोटा या करिता राखीव होते व सदर गाळ्यांकरिता त्या जाहिरातीमध्ये प्रतिसाद न मिळाल्यामुळे शासनाच्या धोरणानुसार सदर गाळ्यांची जाहिरात पुन्हा सन २०१६ च्या सोडतीत प्रस्तावित करण्यात आली व सदर जाहिरातीमध्ये त्या ३ गाळ्यांची विक्री किंमत ५२,४४,२४१/- प्रति सदनिका अशी निश्चित करण्यात आली. सदर किंमतीनुसार सदर गाळ्यांचा प्रति चौ. फुट चटई क्षेत्रफळ दर रु. १०,९५८/- एवढा येतो.

सदर ३ गाळ्यांची विक्री किंमत निश्चित करताना सन २०१५ ते २०१६ एवढ्या कालावधीच्या व्याजाचे भांडवलीकरण करुन रक्कम पुर्वीच्या विक्री किंमतीमध्ये समाविष्ट करुन विक्री किंमत निश्चित केल्यामुळे ३ गाळ्यांच्या विक्री किंमतीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

(३) व (४) म्हाडाने सन २०१६ मध्ये विविध उत्पन्न गटांच्या सदनिकांची विक्री केली असून त्यामध्ये अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट योजनेतील सदनिकांचा रु. ३,१०० ते ७,२०० चौ. फुट असा दर येतो. तसेच मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट योजनेतील सदनिकांचा रु. ५,२०० ते १०,२०० चौ. फुट असा दर येतो.

म्हाडाने सन-२०१६ मध्ये विविध उत्पन्न गटांच्या सदनिकांची विक्री केली असून सदरहू दर हा सध्याच्या शिघ्र गणकाच्या दराच्या ६० टक्के इतका कमी आहे.

या सोडतीत सदनिकांच्या विक्री किंमती कमी असल्यामुळे अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे उपाध्यक्ष, म्हाडा यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या १५ विविध रूग्णालयांसाठी खरेदी करण्यात आलेल्या ५१ ॲन्स्थेशीया मशिन्सबाबत**

**(४१) ६५९३७ (१९-११-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १५ विविध रूग्णालयांसाठी ५१ नग ॲनस्थेशीया मशिन (भूलयंत्र) खरेदी करण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी निविदेची जाहिरात देवून सदर जाहिरातीस प्रतिसाद दिलेल्या ४ निविदाकारांपैकी मे.युनिव्हर्सन ऑरगॅनिक या कमी दर असलेल्या निविदाकाराची निविदा स्विकारून रुपये ५ कोटी, ९६ लाख, ७० हजार इतक्या रक्कमेच्या ५१ मशिन्सचा पुरवठा करण्याचा आदेश माहे डिसेंबर, २०१३ मध्ये देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठेकेदाराने अटी व शर्तीनुसार मशिन मेडिकल इंटरनॅशनल इंग्लड लि. (युके) यांचेकडून पुरवठा करण्याचे निश्चित झालेले असताना ठेकेदाराने इंग्लड ऐवजी गुरगाव, हरियाणा येथील कंपनीची दुय्यम दर्जाची ॲनस्थेशीया मशिनीचा पुरवठा करून अवैध कागदपत्रे सादर करून महापालिकेची फसवणूक करुन कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहार व फसवणूकीबाबत श्री.मिलिंद गवळे, सहाय्यक अभियंता, मध्यवर्ती खरेदी विभाग यांच्यावतीने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी रितसर तक्रार करून सदरहू ठेकेदारांना काळया यादीत टाकुन त्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी केली असुन आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी एफआयआर दाखल केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मे. युनिव्हर्सल ऑर्गनिक्स यांनी अवैध कागदपत्रे सादर करुन मेडिटेक इंटरनॅशनल इंग्लंड लि. (युके) यांचेकडून यंत्राचा पुरवठा करण्याचे निश्चित झालेले असतांना इंग्लंडऐवजी इतरत्र उत्पादित ॲनेस्थेशिया मशिनचा पुरवठा करुन महानगरपालिकेची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे :-

- मे. युनिव्हर्सल ऑर्गनिक्स या कंत्राटदारास कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे.
- सदर कंत्राटदाराने भरलेल्या कंत्राट अनामत रकमा व स्थायी अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच रु. १,७५,९०,९००/- वसुल करण्यात आले आहेत.
- सदर कंत्राटदाराचे व्हेंडर रजिस्ट्रेशन बंद करण्यात आले आहे.
- सदर कंत्राटदाराविरुध्द आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २७.०१.२०१६ रोजी क्रमांक २३/२०१६ रोजी क्रमांक २३/२०१६ अन्वये प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आला आहे.
- सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

---

**खार (पश्चीम) येथील सौजन्न सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अनधिकृत बांधकाम**

**(४२) ६५९३८ (१९-११-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खार (पश्चीम) मुंबई उपनगर जिल्हा येथील १६ व्या रस्त्यावरील प्लॉट क्र. ५२७ बी, सीटी एस क्र.इ.४८ या क्षेत्रावर सौजन्न सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितच्या ग्रेट इप्रियल अपार्टमेंटचे मे.के.आर.जी कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि.चे विकासक श्री.सुनिल आर गोगीया यांनी अनधिकृतरित्या बांधकाम केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामास कार्यकारी अभियंता, श्री. संजय महाले व अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकाराचा दुरूपयोग करून निवासी दाखला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम महाराष्ट्र रिझनल टाऊन प्लॅनिंग ॲक्टच्या कलम ५३ अन्वये निष्कासीत करण्यात यावे अशा आशयाची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :**(१) खार (पश्चिम) मुंबई उपनगर जिल्हा येथील १६ व्या रस्त्यावरील प्लॉट क्र. ५२७ बी, सीटी एस क्र. ई. ४८ या क्षेत्रावर सौजन्न सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या सोसायटीत अनधिकृत बांधकाम आढळून आले आहे.

(२) सदर इमारतीच्या विकासकाने इमारतीच्या बांधकामासाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर करुन दिनांक २५.०३.२०१० मध्ये अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.) घेतली होती. तसेच दिनांक २३.०९.२०१० रोजी प्राथमिक सी.सी. व दिनांक २८.०६.२०११ रोजी पूर्ण बांधकामासाठी सी.सी. घेतली होती.

सदर परवानगीनुसार सदर इमारतीत स्टील्ट + पोडीयम + १ ते १३ मजले व १४ वा मजला (भाग) रहिवाशी इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

सदर इमारतीचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार झाल्यामुळे ते पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीस दिनांक २०.०५.२०१४ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते.

उपरोक्त भाग-१ मध्ये नमूद अनधिकृत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर केल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रार दाखल केली होती.

(४) व (५) सदर प्रकरणी संबंधितांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१), अन्वये दिनांक ०९.११.२०१६ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येत आहे.

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) येथे माहेरचा वसा योजने अंतर्गत निकृष्ट आहार पुरवठा झाल्याबाबत

**(४३) ६६७१७ (१०-११-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे माहेरचा वसा योजनेअंतर्गत बाळंतिणीला व लहान अर्भकांना आरोग्यास घातक व निकृष्ट आहाराचे वाटप झाल्याची कबुली तत्कालीन महापालिका आयुक्त मनोहर हिरे यांनी एका राजकीय पक्षाच्या शिष्ट मंडळास माहे जुलै, २०१६ दरम्यान दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी व लेखाधिकारी यांची चौकशी समिती नेमण्यात आली असता अतिरिक्त आयुक्त यांनी त्याबाबतची नस्ती समितीकडे सुपूर्द न करता स्व:ताकडे ठेवून समितीची चौकशी प्रलंबित ठेवल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अपायकारक आहाराची तपासणी राज्याच्या अन्न व औषध विभागाकडून करवून शासनास अहवाल पाठविण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने महापालिका अधिकारी व कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१६)** :(१) याबाबत राजकीय पक्षाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन आयुक्तांची दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी भेट घेऊन चौकशीची मागणी केल्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर आहाराची अन्न व औषध प्रशासनामार्फत तपासणी करण्यात आलेली नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द तात्काळ कारवाई करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास १५ दिवसांत सादर करण्याच्या सूचना आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

---

**नांदेड जिल्ह्यातील आय.टी.सी कंपनी व वेष्णव एन्टरप्रायझेस एजन्सीबाबत**

**(४४) ६८१६५ (१६-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील आय.टी.सी कंपनी तथा वैष्णव एन्टरप्रायझेस एजन्सीने महापालिकेचे एल.बी.टी कर थकविला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नांदेड महापालिकेस माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागितली असता माहिती देता येत नसल्याचे लेखीपत्र महापालिकेने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून एल.बी.टी. च्या रूपाने शासनाचा महसूल थकविणाऱ्या उक्त कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) होय.

- माहितीचा अधिकार कायदा अधिनियम २००५ चे नियम ११(१) या अधिनियमान्वये कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यवसायीक किंवा वाणिज्यक गुपीतांच्या बाबतीत ची माहिती प्रकट करता येत नाही.
- स्थानिक संस्था करत अधिनियम २०१० चे नियम ५२ च्या प्रयोजनार्थ दिलेल्या कोणत्याही बाबीच्या संदर्भात संबंधित व्यवसायीकाची कोणतीही माहिती प्रकटन करता येत नाही म्हणून ती नाकारण्यात आली.

(३) संबंधिताचे सन २०१०-११ व २०११-१२ चे करनिर्धारण झालेले आहे व उर्वरित वर्षात करनिर्धारण झालेले आहे व उर्वरित वर्षाचे करनिर्धारण करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दादर पश्चिमेकडील गोखले रोडवरील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(४५) ६९२९० (१६-१२-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर पश्चिमेकडील गोखले रोडवरील समाधान बिल्डिंग, अहमद बिल्डिंग, कथ्राडा, सारा मेन्शन, लाहोर मेन्शन, मोहमद्दी मंजिल, बाळकृष्ण सदन, आणि करोलीया ट्रस्ट या १७२ भाडेकरु रहिवाशी असलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीला विकासक म्हणून निवड केल्यानंतर ८ इमारतींची खरेदी करून मालक बनलेल्या विकासकाने वर्षभरापासून भाडे थकविल्यामुळे भाडेकरुंची कोंडी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षापासून विस्थापित झालेल्या भाडेकरुंना भाडे वेळच्या वेळी मिळत नसल्याची लेखी तक्रार इमारत दुरुस्ती मंडळाचे मुख्य अधिकारी यांचेकडे करूनही दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ८ इमारतीच्या पुनर्विकासाचे रखडलेले काम पुर्ण करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०१-२०१७) :**(१) व (२) दादर पश्चिमेकडील गोखले रोडवरील समाधान बिल्डींग, कथ्राडा सारा मेन्शन, लाहोर मेन्शन, मोहम्मदी मंजिल, बालकृष्ण सादर आणि करोलिया ट्रस्ट या इमारतींच्या पुनर्विकासाचे काम रखडल्याने व विकासकाने वर्षभरापासून भाडेकरुचे भाडे थकविल्याची बाब निदर्शनास आले आहे.

(३) व (४) दादर येथील पुनर्विकासाचे काम रखडलेल्या इमारतीमधील रहिवाशी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या इमारतीमधील रहिवाशी, विकासक व लोकप्रतिनिधी यांचेसोबत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दि.२३.५.२०१६ रोजी बैठक घेतली.सेवा भवन जवळील या इमारतींच्या विकासकाने तांत्रिक अडचणीमुळे प्रकल्पास विलंब झाल्याचे मान्य करुन प्रकल्प जलदगतीने पुणे करणार असल्याचे आश्वासन दिलेले आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प किती कालावधीत पुर्ण करणार याबाबत लेखी कळविणे तसेच रहिवाश्यांचे थकीत भाडे त्वरीत अदा करण्याबाबत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेव्दारे विकासकास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगोला नगरपालिकेच्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन टाऊन हॉलबाबत

**(४६) ७०३२३ (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोला नगरपालिकेने सुमारे दहा ते बारा वर्षापूर्वी दोन कोटी रुपये खर्च करुन उभारलेले पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन टाऊन हॉल गत

काही महिन्यांपासून नादुरुस्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेवून सदर स्मृती भवनाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) :**(१) व (२) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन टाऊन हॉलचे खराब झालेले पत्रे दुरुस्तीकरीता दिनांक ३०/०६/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.२१ अन्वये मंजूरी प्राप्त झाली असून त्यानुसार दिनांक १६/०९/२०१६ अन्वये नगरपरिषदेने ठेकेदारास कामाचा कार्यादेश दिला. सदर काम दि.१६/११/२०१६ रोजी पूर्ण झाले असून सदर स्मृतीभवन सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील विविध भागाच्या विकास कामांबाबत

**(४७) ७०५३३ (१६-१२-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील विविध भागाच्या विकास कामासाठी सोलापूर महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेने सन २०१६-१७ या वर्षाच्या अंदाजपत्रकाला एकमताने मंजूरी दिली असतानाही याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन मा.मुख्यमंत्री यांनी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात सुचविलेल्या कामांना स्थगिती देण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेच्या शहरातील विकास कामांमध्ये अडचणी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन महापालिकेच्या अर्थसंकल्पावरील स्थगिती आदेश उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१७) :**(१) व (२) सोलापूर महानगरपालिकेच्या २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात भांडवली कामांच्या अर्थसंकल्पात क्र.१ ते १८४४ कामांपैकी क्र.१५०० ते १८४४ या कामांसाठी केलेल्या रुपये १९.८४ च्या कामांची अमंलबजावणी करण्याबाबत शासनाने दिनांक २६.०७.२०१६ रोजी स्थगिती दिली आहे.

(३) व (४) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## नांदेड महानगरपालिकेतील गैरव्यवहार

**(४८) ७०६२६ (०२-१२-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेस शासन मान्यतेशिवाय कोणतीही जमिन विकण्याचा अधिकार नसतांना सहायक आयुक्त श्री.प्रकाश येवले यांनी त्यांचे बंधू श्री.मा.मा. येवले यांना मुख्य रस्त्यावरील मोक्याचा भूखंड विक्री करुन पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी माहे जून, २०१६ मध्ये त्यांच्याविरुध्द चौकशी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व शासनाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

वजिराबाद मटन मार्केट येथील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७९ (क) नुसार नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रमांक १३७ दिनांक २१.११.२०१४ अन्वये प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीस दादासाहेब गायकवाड सभागृहासाठी रेडीरेकनर दराने विक्री करण्यात आली आहे.

या व्यवहारासंदर्भात नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी प्रथमत: नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने याप्रकरणात दोन्ही पक्षांची सुनावणीची प्रक्रीया आरंभली होती. सद्या या प्रकरणात सुनावणीची कार्यवाही चालू आहे. तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी त्यांची बदली झाल्यानंतरच्या कालावधीत घेतलेल्या निर्णयासंदर्भात शासनाने चौकशी आदेशीत केली असून या चौकशीमध्ये या प्रकरणाचाही समावेश आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयातील अपुऱ्या सोयीसुविधा

**(४९) ७१४४७ (१६-१२-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली पुर्व व पश्चिम क्षेत्रासाठी शास्त्रीनगर रुग्णालय हे एकमेव शासकीय रुग्णालय असताना अपुऱ्या सोयीसुविधामुळे डेंग्यू, चिकणगुनिया सारख्या आजाराचे गरीब रुग्ण उपचाराअभावी एकतर जिवास मुकत आहेत किंवा कर्ज काढून खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेणे सामान्य जनतेला अशक्य असल्याने याबाबत परीसरातील नागरिकांमध्ये आरोग्य प्रशासनाविरुध्द असंतोष पसरला असल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील शास्त्रीनगर रुग्णालयाच्या माध्यमातून डेंग्यू व चिकणगुनीया या आजारांच्या निदानाकरीता रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांच्या नियमितपणे चाचण्या करण्यात येतात. तसेच या रुग्णालयातील आंतररुग्ण विभागात दाखल झालेल्या रुग्णांना उपचार सुविधा पुरविली जात असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिक यांनी कळविले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महापालिकेने देखरेखीचे कंत्राट दिलेल्या एजन्सीने चार कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(५०) ७१७५४ (०२-१२-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालमत्तांची देखरेख करणेसाठी कंत्राटी तत्वावर सुरक्षा रक्षक नेमण्याचे कंत्राट दिलेल्या एजन्सीने चार कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागाने चौकशीअंती दिलेल्या अहवालात ३ कोटी, ९४ लाख, १४ हजार रुपयांचा हिशोब जुळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षकांची नेमणुक केली नाही तरीही त्यांच्या पगाराची देयके उचलली आहे तसेच सन २०१४ मध्ये ७४ सुरक्षा रक्षकांचे पगार दोन वेळा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गैरव्यवहारात सहभागी असलेले दोषी अधिकारी व पदाधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षक यांनी केलेल्या अभिलेख्यांच्या प्राथमिक तपासणीत अनियमितता झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचे खुलासे मागविण्यात आले आहेत. प्राप्त खुलाश्यांची छाननी करून सविस्तर चौकशी करण्यासाठी मुख्यलेखापरिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीस एक महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर दोषी अधिकारी/पदाधिकारी यांचे विरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.